आकाशवाणी नागपूर,
(मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
मंगळवार दिनांक ०२ डिसेंबर २०२५

ठळक बातम्या

1. राज्यातल्या सर्व २४३ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकीची मतमोजणी येत्या २१ डिसेंबरला करण्याचे मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर पीठाचे आदेश.
2. निवडणुका पुढे ढकलल्या जाणं हे यंत्रणांचं अपयश असल्याची सत्ताधारी आणि विरोधी पक्षांची प्रतीक्रिया.
3. मतदार याद्यांचं पुनरिक्षण आणि इतर मुद्द्यांवरुन संसदेत गदारोळ, लोकसभेचं कामकाज दिवसभरासाठी स्थगित.

आणि

4. एम्स नागपूरचा सातवा स्थापना दिन साजरा, आतापर्यंत 25 हजार शस्त्रक्रिया यशस्वी केल्याची संचालक डॉ. प्रशांत जोशी यांची माहिती.

-------------

मतमोजणी 21ला

राज्यातल्या सर्व २४३ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकीची मतमोजणी येत्या २१ डिसेंबरला करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठान दिले आहेत. सुरवातीच्या कार्यक्रमानुसार या सर्व जागांसाठी आज मतदान होणार होतं, मात्र न्यायालयीन अपील झालेल्या नगरपरिषदा आणि नगरपंचायतींमध्ये २० डिसेंबरला मतदान घेण्याचा निर्णय निवडणूक आयोगान घेतला. यामध्ये २४ नगराध्यक्ष आणि २०४ सदस्यांच्या जागांचा समावेश आहे. त्यामुळे आज एकूण २६४ नगरपरिषदा आणि नगरपंचायती जागांसाठी मतदान होत आहे. सर्व निवडणुकांचे निकाल एकाच दिवशी जाहीर व्हावेत, अन्यथा २० नगरपरिषदांच्या निकालावर प्रभाव पडू शकतो, अशी याचिका उच्च न्यायालयाच्या नागपूर पीठासमोर दाखल करण्यात आली होती. त्यावर आज झालेल्या सुनावणीत न्यायालयान सर्व निकाल एकत्र २१ डिसेंबरला जाहीर करण्याचे आदेश दिले. तसंच या निवडणुकीचे एक्झिट पोलही २०डिसेंबरला निवडणूक संपल्यानंतर अर्धा तासान जाहीर करता येतील, आणि नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीची आदर्श आचारसंहिताही २० डिसेंबरपर्यंत लागू राहील, असंही न्यायालयान स्पष्ट केलं. घोषित केलेल्या निवडणुका पुढे ढकलल्या जात आहेत, हे यंत्रणांचं अपयश असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. यावर आपण याआधीही नाराजी व्यक्त केल्याचं त्यांनी आज मुंबईत वार्ताहरांशी बोलताना सांगितलं. तर न्यायालयाच्या या आदेशामुळे निवडणुकीचा खेळखंडोबा झाला असून, याला राज्य सरकार जबाबदार असल्याचा

आरोप काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केला. ते नागपूर इथं वार्ताहरांशी बोलत होते. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्य निवडणूक आयोगावर टीका केली आहे-

*शेवटच्या दिवशी निवडणुका रद्द करणे हे इतिहासातलं पहिलं उदाहरण आहे. राज्य निवडणूक आयोगानी जे काय निर्णय घ्यायला पाहिजे होते. 23 तारखेलाच घ्यायला पाहिजे होते पण वेळेवर निवडणूक रद्द करून या ठिकाणी तो एक जनतेची नाराजी आणि जनतेच्या मनात संभ्रम निर्माण केले आहे. ते तर योग्य नाही आहे.*

मतदान–विदर्भ

दरम्यान, राज्यातल्या २२२ नगरपंचायती आणि नगरपरिषदांसाठी आज शांततेत मतदान झालं. विदर्भात देखील सर्वत्र मतदानाचा उत्साह दिसून आला. नागपूर जिल्हयात १५ नगरपरिषद आणि १२ नगर पंचायती साठी आज सकाळ पासून मतदानाला सुरुवात झाली असून नागपूर जिल्ह्यातील डीगडोह नगर परिषद येथे मतदान केंद्रावर मतदारांची मोठी गर्दी पहायला मिळाली . मतदारांना आकर्षित करण्यासाठी खास पिंक थीम असलेलं सखी मतदान केंद्र तयार करण्यात आलं होत. गुलाबी थीम असलेल्या या मतदारसंघात फुल लावून त्याचप्रमाणे फुगे लावून मोठी रांगोळी काढत मतदारांच स्वागत करण्यात आल. अगदी सुसज्ज आणि सजवलेल्या या मतदान केंद्रावर मतदारांची मतदानाचा अधिकार बजावण्यासाठी सकाळपासूनच गर्दी पाहायला मिळाली आहे. नागपुरात दुपारी साडे तीन पर्यन्त ४५.९५% मंतदानाची नोंद झाली आहे. गडचिरोली, देसाईगंज आणि आरमोरी या तीन नगर परिषदांच्या निवडणुकीत दुपारी साडे तीन पर्यन्त सरासरी ५४.८१ टक्के मतदान झाले. बुलढाणा इथं ४९.०४%, वाशिम इथं ४६.५३%, वर्धा इथं ४४.४० टक्के, अकोला इथं ५१.३१ टक्के अमरावती जिल्ह्यात दुपारी साडेतीन पर्यंत ४९.८० % मतदान नोंदविण्यात आलं आहे.

शिष्यवृत्ती

राज्य परीक्षा परिषदेमार्फत येत्या २२ फेब्रुवारी रोजी घेण्यात येणाऱ्या पाचवी आणि आठवी च्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती परीक्षेचे अर्ज भरण्यासाठी आठ डिसेंबर पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. विलंब शुल्कासह ३१ डिसेंबरपर्यंत अर्ज करता येणार असल्याची माहिती, परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी दिली.

वक्फ दुरुस्ती

वक्फ दुरुस्ती कायदा, २०२५ अंतर्गत वक्फ मालमत्ता नोंदणीसाठी सहा महिन्यांची अंतिम मुदत वाढवण्याची मागणी करणाऱ्या याचिकांवर सुनावणी करण्यास सर्वोच्च न्यायालयानं नकार दिला

आहे. वक्फ मालमत्ता धारकाला नोंदणीत येणाऱ्या अडचणींच्या पार्श्वभूमीवर, वक्फ न्यायाधिकरणासमोर सहा डिसेंबरपर्यंत अंतिम मुदत वाढवण्याची मागणी करता येईल, असा पर्याय न्यायालयानं सुचवला आहे.

संसद

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या आजच्या दुसऱ्या दिवशी मतदार याद्यांच्या सखोल पुनरीक्षणाचा मुद्दा दोन्ही सभागृहात गाजला. या विषयावर तातडीन चर्चा करण्याची मागणी करत विरोधी पक्षाच्या सदस्यांनी जोरदार घोषणाबाजी केल्यामुळे दोन्ही सभागृहांचं कामकाज अनेक वेळा तहकूब झालं. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजीजू यांनी शांततेचं आवाहन केल्यानंतरही विरोधक चर्चेसाठी आग्रही राहिले. त्यामुळे लोकसभेचं कामकाज आधी दोन वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.त्याआधी सखोल पुनरीक्षणावर तातडीन चर्चा सुरू करण्याची मागणी विरोधी पक्षांनी लावून धरली. लोकशाही आणि नागरिकांच्या हितासाठी ही चर्चा होणं गरजेचं आहे, असं राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे म्हणाले. तर विरोधकांच्या घोषणाबाजीवर संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी नाराजी व्यक्त केली. सरकार सर्व विषयांवर चर्चा घडवून आणण्यासाठी तयार आहे. मात्र सगळया चर्चा आत्ताच व्हाव्यात हा विरोधकांचा अट्टाहास योग्य नाही, नवे नवे मुद्दे शोधून संसदेच्या कामकाजात अडथळा आणणं बरोबर नाही, असं रिजिजू संसद भवन परिसरात वार्ताहरांशी बोलताना म्हणाले.

*विंटर सेशन पार्लियामेंट में बिज़नेस तय किया गया है। बहुत सारा मुददे है और कई मुददे जो अपोज़ीशन ने भी उठाया उसपे हम बातचीत करके आगे क्या करना है इसमें विचार करेंगे। नए नए मुददे ढूंढ करके पार्लमेंट को डिस्टर्ब करने के लिए बहाना बनाने का कोई आवश्यकता नहीं है। हर मुद्दे अपनी जगह में इम्पोर्टेन्ट है लेकिन मुद्दे को आप हथियार बना करके पार्लमेंट को स्टॉल करेंगे ये तो ठीक नहीं है.*

दुपारी दोन वाजता सभागृहाचं कामकाज सुरू झाल्यावर पुन्हा एकदा प्रश्नोत्तराचा तास सुरू झाला. पीएम किसान योजना सुरू झाल्यापासून या योजनेद्वारे आतापर्यंत २१ हप्त्यांमधे शेतकऱ्यांना ४ लाख कोटी रुपये मदत वितरित केल्याची माहिती केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी लोकसभेत एका प्रश्नाला उत्तर देताना दिली. शेतकरी केंद्रित डिजिटल पायाभूत सुविधांमुळे कोणत्याही मध्यस्थाशिवाय शेतकऱ्यांना थेट लाभ दिला जातो असं चौहान म्हणाले. यानंतर घोषणाबाजी न थांबल्यामुळे सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.राज्यसभेतही मतदार याद्यांच्या सखोल पुनरीक्षणाविषयी चर्चा करण्याची मागणी करत विरोधकांनी घोषणाबाजी केल्यामुळे कामकाज दुपारी दोन वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं होतं.

एम्स नागपूर सातवा स्थापना दिन

एम्स नागपूरन काल सातवा स्थापना दिन साजरा करत सात वर्षांच्या सेवायात्रेचा आढावा घेतला. या कालावधीत संस्थेन २४ लाख ओपीडी रुग्ण, ९८ हजार आयपीडी रुग्ण आणि जवळपास २५ हजार शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण केल्याची माहिती कार्यकारी संचालक डॉ.प्रशांत जोशी यांनी दिली. संस्थेत ५२ मूत्रपिंड प्रत्यारोपण, १०अस्थिमज्जा प्रत्यारोपण, २९ कॉर्निया प्रत्यारोपण तसच अत्याधुनिक बीएमटी आणि एनएटी रक्त तपासणी सुविधा उपलब्ध करून मध्य भारतातील तृतीयक आरोग्य सेवेत मोठी भर घातली आहे. यावेळी प्रमुख पाहुणे डॉ.अनंत पांढरे आणि अतिथी डॉ.संजय पैठणकर यांनी नव्या तंत्रज्ञान, संशोधन आणि रुग्ण-केंद्रित सेवांमधील एम्सच्या योगदानाच कौतुक केल. कार्यक्रमात 'अभिज्ञानम' या मुखपत्राच प्रकाशन आणि  गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

हवामान

विदर्भात भंडारा जिल्ह्यात सर्वाधिक कमी 10 अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद झाली.  भंडारा पाठोपाठ यवतमाळ इथं 11.8  तर गोंदिया इथं 12.2  आणि नागपुर इथं 12.4 अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद झाली आहे.  उर्वरित सर्व जिल्ह्यांमध्ये तापमान 12 ते 14 अंश सेल्सिअस दरम्यान आहे

महावितरण

उपराजधानी नागपूरमध्ये 8 डिसेंबरपासून सुरू होणाऱ्या विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनासाठी महावितरण सज्ज झाले असून शहरातील वीजपुरवठा कोणत्याही परिस्थितीत खंडित होऊ नये, यासाठी विशेष योजना आखण्यात आली आहे. अधिवेशन काळात कोणत्याही सरकारी यंत्रणेन किंवा नागरिकांनी विनाकारण खोदकाम करू नये, अस महावितरणन स्पष्ट केल आहे.

शहिदी शताब्दी

हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादुर साहिबजींच्या 350 व्या शहिदी शताब्दी समागम कार्यक्रमातून सर्व समाजात एकता आणि बंधुतेची भावना निर्माण व्हावी, असा विश्वास समितीचे राज्यस्तरीय सदस्य किसन राठोड यांनी व्यक्त केला. नागपूरमध्ये 7 डिसेंबरला होणाऱ्या या कार्यक्रमासाठी वर्धा जिल्हा प्रशासनाची तयारी आणि जनजागृती उपक्रमांचा आढावा बैठकीत घेण्यात आला.

****